International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.4 Mar – Apr 2023

# विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था : लेखा परिक्षणाची चिकित्सा

**हितेंद्र आर.आहेर,**[1] **डॉ. कंदी श्रवण कुमार,**[2]
[1]संशोधक विद्यार्थी, ओपीजेएस युनिव्हर्सिटी, सादूलपूर
[2]संशोधन मार्गदर्शक, ओपीजेएस युनिव्हर्सिटी, सादूलपूर
*Corresponding Author* - हितेंद्र आर.आहेर
इ - मेल- jaykarmaveer@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7837180

**प्रस्तावनाः** विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था या ग्रामपातळीवर कृषी व कृषीपूरक कार्यासाठी पतपुरवठा करणाऱ्या महत्वाच्या संस्था असतात. प्रत्येक तालुक्यातील विविध सहकारी संस्था या सहकार खात्याचे तालुका उपनिबंधक व जिल्हा बँक यांच्याशी संलग्न असतात. अर्थातच सरकार खाते महाराष्ट्र राज्य, शिखर बँक, जिल्हा बँक, जिल्हा बँकेची शाखा व पुढे ग्रामीण भागातील प्राथमिक कृषी सहकारी संस्था अशी ही उतरंड असते. सहकार कायदा महाराष्ट्र राज्य यांचे अनुसरण या संस्थांना करावे लागते. जिल्हा बँकेच्या मूलभूत कामात या प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचा मुख्य वाटा असतो आणि कृषक समाजही आपल्याच सहकारी प्राथमिक सेवा संस्थेवर अवलंबून असतो. येथे प्राधान्याने प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या कार्याचे विश्लेषण आणि लेखा परिक्षणाची चिकित्सा यावर लक्ष केंद्रित करण्यात आलेले आहे.

**उद्देश :** 1. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या कार्याचे विश्लेषण करणे.

2. कृषी वित्तविषयक कार्याची चिकित्सा करणे.

3. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या लेखापरिक्षण अहवालाचे विश्लेषण करणे.

4. विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या सचिवाच्या कार्याचे विश्लेषण करणे.

**अभ्यासपध्दती :** नमुना निवड पध्दती - सर्वेक्षण पध्दती.

**अभ्यासाची आवश्यकताः** कर्ज काढल्याशिवाय शेतीसाठी भांडवल उपलब्ध होत नाही. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था या मूलभूत संस्था आहेत. ग्रामीण भागातील गावकरी शेतकरी यांनी प्राथमिक कृषी पतपुरवठ्यासाठी सहकार तत्वानुसार ही संस्था स्थापित झालेली असते. सहकाराची तत्वे पूर्णपणे या संस्थांना लागू होतात. प्रत्येक भागधारक शेतकरी मालक असतो. सदस्यांनी कार्यकारी मंडळ निवडून दिलेले असते व कार्यकारी मंडळास वैधानिक सहकार्य करण्यासाठी, हिशोब राखण्यासाठी प्रत्येक सेवा संस्थेस सचिव असतो. सचिवाने नियमानुसार कामकाज करुन सभासदांचे हितरक्षण करायचे असते. कर्जवितरण व कर्ज वसुली याबाबतीत सर्व दक्षता कार्यकारी मंडळास आणि सचिवास द्याव्या लागतात. कृषी वित्तपुरवठयाबरोबरच स्वस्त धान्य दुकान, कृषी मार्गदर्शन केंद्र चालवणे, पेट्रोल पंप चालवणे, खरेदी विक्री संघ, ग्राहक शिक्षण केंद्र या प्रकारची कार्येही या संस्था करीत असतात. या संस्थांच्या लेखा परिक्षण अहवालाची चिकित्सा करावयाची आहे. यासाठी नमुना म्हणून खालप विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या कार्यपद्धतीचा परिचय करून दिला आहे.

**गृहितक :** विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या लेखा परिक्षणातून संस्थेचे कार्य, त्रुटी, सुधारणा व उपाया याबद्दलचा बोध होतो.

**नाशिक जिल्हा विविध कार्यकारी सेवा संस्था :** नाशिक जिल्ह्यातील एकूण विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची संख्या 1053 आहे. त्यापैकी नाशिक तालुक्यात 65, मालेगाव-129, निफाड-140, येवला तालुका-83, सटाणा तालुका 100, दिंडोरी तालुक -64 तसेच कळवण तालुका-43, देवळा तालुका-43, नांदगाव तालुका-72, सिन्नर तालुका- 99, इगतपुरी तालुका-60, त्र्यंबकेश्वर तालुका-26, पेठ तालुका-13, सुरगाणा तालुका-34, चांदवड तालुका-82 अशी नाशिक जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा संस्थांची संख्या आहे.

ही आकडेवारी पाहिली तर निफाड हा बागायती, जलसिंचन संपन्न आणि फळबागायत क्षेत्र म्हणून प्रसिद्ध

आहे. एका खेड्यात एकाहुन अधिक वि. का. सेवा सहकारी संस्था तेथे अधिक आहेत. त्याखालोखाल मालेगाव तालुक्यात आकारमान व कृषी व कृषीपूरक व्यवसायामुळे तेथेही 129 ही संख्या आहे. सटाणा - सिन्नर या तालुक्यांची संस्थांची संख्याही लक्षणीय आहे. मात्र आदिवासी बहुल संख्या, शेतजमिनीची प्रतवारी, कृषी विषयक जागरुकता, भौगोलिक परिस्थिती यामुळे सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर या तालुक्यातील संस्थांची संख्या कमी आहे. पेठ तालुक्यात सर्वात कमी म्हणजे 13 च संस्था आहेत. इगतपूरी हा आदिवासी बहुल तालुका आहे. मात्र राष्ट्रीय महामार्ग, नाशिक - मुंबईपासूनचे अंतर, रेल्वे व धरण योजना, विद्युत प्रकल्प यामुळेही आदिवासी भागातील इगतपुरी तालुक्यात 60 वि. का. सेवा सह. संस्था आहेत. जिल्ह्यातील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांना वित्तपुरवठा व कर्जे जिल्हा बँकेकडून उपलब्ध होतात. स्थानिक/ग्रामीण पातळीवर सोसायटी, कार्यकारिणी, सचिव, बँकेचे विभागीय शेती अधिकारी कर्जफेडीबद्दल जाणीव जागृती करीत असतात परंतू सर्वच शेतकरी कर्जदार कर्जफेड करु शकत नाहीत. मात्र काही गावातील या संस्था आपल्या सर्व शेतकरी सभासदांना प्रोत्याहित करुन संपूर्ण कर्जदारांना कर्जफेडीसाठी प्रेरित करतात. 100 % कर्जफेड करणाऱ्या संस्थांची यादी वार्षिक अहवालात प्रसिद्ध होत असते. यामुळे तालुक्यातील/जिल्ह्यातील 100 % कर्जफेडीची क्षमता- पातळी लक्षात येते.

**विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था: कार्यपद्धती :**
गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सभासद होऊन निर्माण केलेली कृषी कृषीनिगडीत कार्य करणारी सहकारी संस्था म्हणजे विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था होय. प्राथमिक सहकारी कृषी संस्था असेही या संस्थांना संबोधले जाते. 'विविध कार्यकारी' या शब्दबंधात 'विविध कार्ये' दर्शविली आहेत. ही विविध कार्ये कृषीविषयक गरजांची आर्थिक आपूर्ती दर्शवितात. या संस्था गावापुरत्या मर्यादित असतात. आपल्याकडील गावे प्रामुख्याने कृषीशी संबंधित असतात. लहान लहान दोन - चार गावांतील एक सामुदायिक सहकारी सेवा संस्थांही असू शकतात. उदाहरणार्थ आदिवासी, दुर्गम क्षेत्रात लहानमोठ्या पाड्यांसाठी एकच कृषी संस्था सहकारी तत्वावर तेथील शेतकऱ्यांनी निर्माण केलेली असते. एकत्र येणे, एकत्र येऊन सभासद वर्गणी भरुन सभासद झालेले असतात. सभासद वर्गणी म्हणजेच एक प्रकारे समभाग घेतलेले असतात. सभासद वर्गणी देऊन सभासद झालेल्यांचा सहभाग हा सहकारी तत्वाने भागभांडवल निर्माण करणारा ठरतो.

काही विविध कार्यकारी सोसायट्या अन्नधान्य दुकाने म्हणजेच शासकीय रेशन दुकानेही चालवतात, कृषीविषयक वस्तू, साधने, खते, कीटकनाशके अशी कृषीनिगडीत संसाधने ग्राहक सहकारी भांडार म्हणूनही कार्यशील राहत असतात. प्राथमिक कृषी संस्थांना जिल्हा मध्यवर्ती बँक, सहकार खात्याचे तालुका उपनिबंधक-पुढे जिल्हा सहकारी उपनिबंधक, सहकार खाते शासन, नाबार्ड बँक, सहकारी शिखर बँक यांच्या निर्देशांचे पालन करावे लागते. सहकारी सेवा संस्थांना केडर नियुक्तीप्रमाणे 'सचिव' पुरवलेला असतो. सहकार खात्याच्या नियंत्रणात जिल्हा सहकारी मंडळ बोर्ड असते. तालुका उपनिबंधकाचे थेट नियंत्रण सचिवावर असते. तालुक्याचा लेखापरिक्षक सहकारी संस्था हा लेखापरिक्षण करुन अहवाल तयार करीत असतो व हा अहवाल संस्थेत व वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांपर्यंत संप्रेषित केला जातो.

**विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था : ठेवी व कर्जव्यवहार -** विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था ठेवी स्वीकारणे, बाहेरील कर्जे मिळवणे, कर्ज वितरण व वसूली करणे असे कार्य करतात. रोजकीर्द ते मासिक जमाखर्चाची पत्रके विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या संचालक मंडळासमोर ठेवली जातात. मासिक सभेत जमाखर्चाची पत्रके मंजूर/नामंजूर/सुधारित/उचित करुन घ्यावी लागतात. या सर्व व्यवहारात संस्था सचिव आणि चेअरमन, संचालक यांच्यातील समन्वय महत्वाचा असतो. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था: लेखापरिक्षण विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेचे सहकार वर्षात वार्षिक लेखापरिक्षण होणे आवश्यक आणि बंधनकारक असते. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत लेखापरिक्षकाच्या नुमणूकीचा ठराव केलेला असतो. वैद्यनाथन समितीच्या शिफारशीनुसार समान लेखा पद्धती व संबंधित परिपत्रकानुसार हिशेबाच्या नोंदवह्या, लेखी - तोंडी माहिती वैगरे कागदपत्रे चेअरमन/सचिव यांनी लेखा परिक्षकास सादर करावे लागते. महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा 1960 चे कलम 81 (4) व नियम 61 अन्वये लेखापरिक्षणाकरिता अचूक आर्थिक पत्रके सादर करण्याची जबाबदारी संचालक मंडळाची असते. संचालक मंडळाने सादर केलेल्या आर्थिक पत्रकावरुन लेखापरीक्षण केले जाते. उपलब्ध कागदपत्रांच्या प्रत्यक्ष पाहणी/तपासणी/नियम सुसंगतता पाहून हे लेखापरीक्षण करण्यात येते.

नाशिक जिल्हा सहकारी बँकेच्या स्थापनेपूर्वीच कितीतरी विविध कार्यकारी सहकारी संस्थांची स्थापना झाली आहे. कर्जपुरवठा आता मात्र जिल्हा सहकारी बँकेमार्फत केला जातो. येथे नमुना म्हणून खालप विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था मर्यादित खालप ता. देवळा जि. नाशिक या संस्थेच्या कार्यपद्धतीचा परिचय अहवालाच्या आधारे करुन दिला आहे. या संस्थेचा नोंदणी क्र. 5460 असून नोंदणी दिनांक 26/05/1926 रोजी झालेली आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र खालप गावापुरते मर्यादित असून 1107 इतके व्यक्तिगत सभासद आहेत. नाममात्र, हितचिंतक, संस्था किंवा अन्य सभासद नाहीत नवीन सभासद करुन घेताना शेतजमिनीचा सात/बारा उतारा, ग्रामपंचायतीचा ग्रामस्थ/शेतकरी असल्याचा दाखला व सभासद वर्गणी/समभाग मूल्य भरावे लागते. संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या मासिक सभेत सर्व कागदपत्रांची तपासणी करुन सभासद म्हणून मान्यता दिली जाते. सभासदास शेअर होल्डर म्हणून शेअर सर्टीफिकेट दिले जाते. अर्थातच सचिवाने सहकार खात्याच्या नियमानुसार शेअर सर्टीफिकेट देणे, पावती देणे, सभासद यादीत नाव समाविष्ट करणे व इतर सर्व नोंदी करणे ही कामे करावयाची असतात. मृत सभासदाचे वारसासही सभासद व्हायचे असल्यास त्यास सभासद करुन घ्यावे लागते. संस्थेमार्फत स्वस्त धान्य दुकानही चालविले जाते.

खालप येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या सभासदांच्या यादीचे निरीक्षण केल्यावर लक्षात येते की काही सभासदांची शेअर्स रक्कम रु.10, 40, 90, 85, 275, 100, 205 ते 25,000 रु. पर्यंत आढळून येते. म्हणजेच 10 रु. सभासद समभाग रक्कम असलेल्या सभासदांनी कर्ज काढलेले नाही. ज्यांची रक्कम वाढली त्यांनी कर्जे काढली, कर्जे काढतांना काही ठराविक रक्कम शेअर भांडवल म्हणून जमा केली जाते. कर्जे घेणे, कर्ज परत फेडणे या प्रक्रियेत शेअर भांडवल म्हणजेच भागभांडवल वाढत जाते. 31/03/2020 रोजी सभासद- समभाग रक्कम रु.78,73,110/ - आहे. लेखी सभासद करताना लेखी अर्ज घ्यावे लागतात, त्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे तपासून घेतली जातात. महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या 1960 च्या कायद्यातील नियम 32 व 65 (1) अन्वये आय नमुना सभासद नोंदवही संस्थेने अद्ययावत करायची असते. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या 1961 च्या नियम 33 जे या नमुन्यातील सभासद यादी तयार करावी लागते. मृत/काढून टाकलेल्या/राजीनामा दिलेल्या सभासदांच्या नावापुढे योग्य ती नोंद करावी लागते. राजीनामे रितसर व यथोचितरित्या स्वीकारावे लागतात. महाराष्ट्र सहकारी नियम 25 नुसार वारस नोंद करावी लागते आणि त्याची नोंद नियम 26 नुसार सभासद झालेल्या नोंदवहीत यथोचितरित्या करावी लागते. समभागासाठी आलेल्या अर्जांची विहितपद्धतीने पाहणी करावी लागते. आलेले अर्ज बरोबर असल्याचे/नसल्याचे वस्तुनिष्ठ निरीक्षणाने नोंदवावे लागतात. समभागाची नोंदवही अद्ययावत लिहावी लागते. भागाच्या नोंदवहीतील नोंदी कीर्दीतील नोंदीशी जुळणाया असाव्यात म्हणजेच नोंदहीतील नोंदी व कीर्दीतील नोंदी समसमान/बरोबर असतात. समभागांची खतावणी वेळोवेळी अद्ययावत लिहावी लागते. भागाची एकूण खतावणी बाकी ताळेबंदाशी भांडवलाच्या आकड्यांशी जुळनी असावी लागते. समभागधारकांना त्यांनी घेतलेल्या सर्व भागांबद्दल भाग - दाखले द्यावे लागतात. भागाचे हस्तांतरण अगर त्यांची किंमत परत देणे या गोष्टी कायदा, नियम व पोटनियम यातील तरतूदीप्रमाणे व्हाव्या लागतात. नियम 35 नुसार पोटनियमांच्या आधीन राहून संस्थेने कर्ज घेण्याची मर्यादा ठरवलेली असते. शेतजमिनीचा आकार, स्थावर जंगम मालमत्ता, इतर ठिकाणाहून घेतलेले कर्जे, थकबाकी, शासकीय योजना, सहकार खात्याची नियमावली व शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन कर्ज घेण्याची मर्यादा बंधनकारक असते शिवाय शेतकऱ्यांची पत आणि संस्थेचे नियम हे बंधनकारक असतातच!

संचालक मंडळाच्या सभा बारा महिन्यांसाठी बारा असतात. वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभा याबाबतीतही कालावधी निश्चित केलेला आहे. सर्व सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा लोकशाही पद्धतीने आणि सहकार कायद्यानुसार घ्यावी लागते. वार्षिक सर्वसाधारण सभेत कामकाज अहवाल- भविष्ययोजना आर्थिक देवघेव याबाबतीत चर्चा प्रस्ताव- अहवाल, ठराव सारे करणे बंधनकारक असते. सर्व कामकाजाचा लेखापरीक्षण अहवालही पाहिला व तपासला जातो. दरवर्षी संस्थेचे लेखापरीक्षण कायद्याने होणे बंधनकारक असते. सहकारी संस्थांचे लेखापरीक्षक यांच्या मार्फत हे लेखापरिक्षण होत असते. लेखापरीक्षणासाठी शुल्काची रक्कम कोषागारात भरावी लागते. सहकारी संस्थांसाठी केडरप्रमाणे नेमलेल्या सचिवाचे वेतन संस्थेमार्फत होते. संस्थेने आपले नोदविलेले पोटनियम व नियम यांची प्रत संस्थेत ठेवावी लागते. पोटनियम व नवे उपनियम/निर्णय

घेतले/केले असतील तर योग्य रितीने योग्य त्या अधिकाऱ्याकडून मान्य करुन घेतलेले असावेत. सहकार वर्षातील नफा - तोटा पत्रकही लेखापरीक्षकांकडून तपासून घ्यावे लागते. उदा . खालप विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेस दि. 31/03/2019 अखेर तोटा रु. 11807311.39 झाल्याची नोंद केलेली आहे. नफा झाल्यास निव्वळ नफ्याची विभागणी करुन सभासदांना भागाच्या प्रमाणात नफ्याचे वितरण करावे लागते. परंतु नफ्यातील विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे प्रमाण अल्प असल्याचे सर्वेक्षणात दिसून आलेले आहे. शिल्लक रक्कम, रोकड व किर्दीत शिल्लक यांच्यात एकसमानता असणे आवश्यक असते. पासबुकातल्या बँकनोंदी व रोजकीर्द यांच्यात ही ताळा करावा लागतो. बँकेतील शिल्लक - बँकेतील पासबुकातील त्यांनी पठवलेल्या पत्रकातील बँकेने दिलेल्या दाखल्यातील शिल्लक रक्कम संस्थेच्या जमाखर्चाच्या नोंदीशी जुळणे आवश्यक असते. मेळपत्रकातून त्याचा खुलासा करुन घेतला जातो. गुंतवणूक रोखे संस्थेच्या नावावर असले पाहिजेत. गुंतवणूकीवरील लाभांश व व्याज यथावत वसूल करावे लागते. गुंतवणूकीची नोंदवही ठेवणे, नोंदवही अद्ययावत करणेही बंधनकारक असते. विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांजवळ स्थावर जंगम मालमत्ता असते, या मालमत्तेच्या नोंदवह्या ठेवाव्या लागतात. मालमत्तेची यादी रक्कम व ताळेबंदातील रक्कम एकमेकांशी जुळणाऱ्या असाव्या लागतात. लेखापरीक्षणात मालमत्तेची यादी घेऊन प्रत्यक्षात रुजूवात घेऊन ताळेबंदातील रकमेशी या बाक्या जुळतात की नाही हे तपासले जाते. स्थावर मालमत्ता संस्थेच्या नावावरच असणे बंधनकारक असते. आवश्यक तेथे मालमत्तेचा विमा उतरावा लागतो.

**<u>लेखापरीक्षकाने अभिप्रायात करावयाची नोंद-</u>**

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम 81 (1) नुसार पुढील स्थितीची अभिप्रायात लेखापरीक्षकाने नोंद करावयाची असते.

1) थकीत कर्ज

2) रोकड रकमा गुंतवणुक रोखे, संस्थेच्या जिंदगी व देणे रक्कमेची सांख्यिकी.

3) तारणापोटी दिलेले कर्ज व आगाऊ रकमा यथोचित संरक्षित असणे कर्ज व आगाऊ रकमांच्या अटी संस्था व सभासद यांच्या हितास बाधक नसाव्यात.

4) निव्वळ पुस्तकी नोंदीद्वारे केलेले व्यवहार असे व्यवहार संस्थेच्या हितसंबंधास बाधक नसावेत.

5) संस्थेस दिलेले कर्ज व आगाऊ रकमा संस्थेने ठेव म्हणून दाखविले आहे काय? तसे असू नये.

6) व्यक्तिगत खर्च महसूल खात्यास नावे टाकले जाऊ नयेत.

7) संस्थेने आपल्या उद्देशांना टाळून विसंगत खर्च करता कामा नयेत.

8) संस्थेने शासनाकडून/शासन नियंत्रित महामंडळाकडून अथवा वित्तीय संस्थेकडून मिळालेले आर्थिक सहाय्य ज्या कारणासाठी मिळालेले आहे त्यासाठीच वापर करणे बंधनकारक असते.

9) संस्था आपल्या सभासदांच्या बाबतीत नमूद केलेली उदिष्ट्ये व जबाबदाऱ्या यथोचितरित्या पार पाडीत असावी.

या प्रत्येक मुद्याबाबत पाहणी करुन लेखापरीक्षकांनी शेरा नोंदविला असावा लागतो. अनियिमितता, बेकायदेशीरपणा, नियमोल्लंघन व कार्यवाहीतील धोके लक्षात आणून द्यावे लागतात.

**<u>थकबाकी वसुली धोरण</u>** : किमान एक वर्षाचे वरील थकबाकीदारांविरुद्ध वसुलीसाठी संस्थेने कारवाई करणे अपेक्षित असते. थकबाकी वसुलीसाठी संस्थेच्या सर्व घटकांनी दक्ष राहावे, नियमानुसार, सहकार कायदे, दिवाणी न्यायालये, लवाद यांच्या आधाराने थकबाकीची वसुली केलीच पाहिजे. याबाबतीत शासकीय निर्देशही पाळले पाहिजेत . स्थानिक पातळीवर चर्चा, संवाद, समजावणी, मनधरणी, कर्जवसुलीचे फायदे असे करुन थकबाकी वसूलीसाठी थकीत कर्जधारकांना कर्ज परताव्यासाठी तयार करणे आवश्यक असते. त्यासाठी निरंतर प्रयत्न व मानवीयदृष्टी महत्वाची असते.

**<u>विविध कार्यकारी सेवा संस्था : सचिवाची भूमिका कृतिविश्लेषण -</u>** येथे 75 विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या सभासदांच्या सर्वेक्षण मुलाखतींचे विश्लेषण केले आहे. सचिवाची कृती, भूमिका यांचे विश्लेषण मुलाखती, सर्वेक्षण प्रश्नावली, प्रत्यक्ष भेटीच्या आधारे केले आहे. संस्थेच्या संचालक मंडळ, सभासद, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अधिकारी यांच्याशी संवादी राहून सचिवाला कार्य करावे लागते. स्थानिक परिस्थिती, शेती स्थिती आणि सभासद शेतकऱ्यांचे प्रश्न सचिवास माहित असतात. कर्ज वितरण, वसुली, थकबाकी वसुली प्रयत्न, हिशोब, सभा आयोजन अशी कार्य सचिवाला करावी लागतात. संचालक मंडळ व सभासद यांच्यातला दुवा म्हणून सचिवाची भूमिका महत्वाची असते.

**हिशोब नोंदी - लेखापरीक्षण कृतीदर्शक तक्ता**

| हिशोब व इतर तपशील कार्यप्रणाली | संख्या 75 पैकी | प्रमाण % |
|---|---|---|
| अद्ययावत रोजकीर्द/खतावणी नोंदी | 39 | 78.66 |
| रोजकीद/खतावणी नोंदी- अपूर्ण | 16 | 21.33 |
| नियमबाह्य कर्जे व आर्थिक व्यवहार नाहीत | 69 | 92.00 |
| नियमबाह्य कर्जे व आर्थिक व्यवहार पूर्वी झालेले आहेत | 06 | 08.00 |
| शासकीय/सहकारखाते/बँक यांच्या निर्देशानुसार झालेले लेखापरीक्षण झालेले आहे. | 75 | 100 |
| लेखापरीक्षणातील त्रुटींची पूर्ती केली आहे | 75 | 100 |
| लेखापरीक्षणातील त्रुटींची पूर्ती केलेली नाही | 60 | 80.00 |
| पुर्वीच्या प्रकरणांमुळे पूर्ती केलेली नाही | 09 | 12.00 |
| संस्था खर्चात संचालक मंडळाचा व्यक्तिगत खर्च | 06 | 08.00 |
| स्वीकारला आहे | 00 | 0 |
| स्वीकारला नाही | 75 | 100 |
| राखीव निधी, इमारत निधी व इतर सर्व प्रकारच्या निधीची संपूर्ण गुंतवणूक बँकेत स्वतंत्र खात्यात गुंतवली आहे. | 58 | 77.33 |
| गुंतवली नाही | 06 | 08.00 |
| प्रक्रिया सुरु आहे | 11 | 14.66 |
| रोकड रक्कम विषयक नियमांचे पालन केले आहे | 75 | 100 |
| कर्मचाऱ्यांचे जामीन बॉड केले आहे | 55 | 73.33 |
| जामीन बाँड तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे | 20 | 26.66 |
| कर्जाच्या रुजूवाती घेतल्या आहेत. | 41 | 54.66 |
| रुजूवातीचे काम अपूर्ण आहे | 34 | 45.33 |
| जिंदगीपत्रांची बँक इन्सपेक्टरने तपासलेली प्रत संस्थेच्या दप्तरी आहे | 58 | 77.33 |
| जिंदगी पत्रे तपासण्याचे काम अपूर्ण आहे. | 17 | 22.66 |
| दंड व्याजाची स्वतंत्ररित्या आकारणी करुन हिशोब दर्शविले आहेत. | 19 | 25.33 |
| असे हिशोब दर्शविलेले नाहीत | 56 | 74.66 |

(संदर्भ- सर्वेक्षण:प्रश्नावली)

**निरीक्षणे:**

- रोजकीर्द - खतावणी व दैनंदिन हिशोब नोंदी 78.66 % नी ठेवलेल्या मात्र 21.33 % च्या कामात अपूर्ण नोंदी केलेल्या आढळल्या.
- दरदिवशी सचिव संस्थेत उपस्थित असेलच असे नाही, एका गावाच्या शेजारी दुसरे गाव/वस्ती असेल किंवा लहान संस्था असेल तर तेथील कामकाजही त्याच सचिवाने पाहायचे असते. एका सचिवाकडे अधिक संस्थांचे कामकाज सोपवलेले असते. त्या संदर्भाने या त्रुटींकडे पाहिले पाहिजे.
- नियमबाह्ये कर्जे 8% संस्थांनी वितरीत केलेली दिसतात. अर्थातच सध्याच्या म्हणजे पाहणीच्या काळातला सचिव त्या नियमबाह्यतेला जबाबदार धरता येणार नाही. आपल्या कार्यकाळात नियमानुसारच काम सुरु असल्याचे मत सर्वच सचिवांनी नोंदवलेले आहे. शिवाय आमची संस्था नियमबाह्य कर्जवितरण करते असे संचालक मंडळ/सचिव सांगणार नाहीत.
- लेखापरीक्षण नियमांनुसार 100 संस्थांनी केलेले आहे.
- लेखापरीक्षणात दर्शविलेल्या त्रुटींची पूर्ती 80% सचिवांनी/संस्थांनी केलेली आहे. लेखापरीक्षणातील त्रुटींची पूर्ती न करता येण्याचे कारण 8% संस्था

सचिवांनी नोंदवलेले आहे. आपल्या कार्यकाळात या त्रुटी घडलेल्या नाहीत हेच त्यांचे मत आहे.

- सहकारी संस्थांही संचालक मंडळाची व्यक्तीगत मालकी नसते, तेव्हा संचालक मंडळाचे व्यक्तिगत खर्च संस्थेच्या खर्चात समाविष्ट करता येत नाही. 100% सचिवांनी संचालक मंडळाचे व्यक्तिगत खर्च संस्थेच्या नावे टाकलेले नाहीत, ही चांगलीच बाब आहे.
- राखीव व इतर निधी स्वतंत्र बँक खात्यात गुंतवणे आवश्यक असते, हे काम 77.33% नी केलेले आहे. 14.66 % च्या बाबतीत प्रक्रिया सुरु आहे तर 8% नी अशी गुंतवणूकच केलेली नाही.
- कर्मचाऱ्यांचे जामीन बाँड 26.66% नी करुन घेतलेले नाहीत.
- कर्जाच्या रुजुवाती करुन घेण्याबाबत 45% सचिवांनी हयगय केली आहे या रुजुवाती करुन घेणे वसुलीप्रक्रियेत रुजूवातींना महत्व येते. वसुलीच्या वेळेसही रुजुवाती पाहाव्या लागतात.

  दंडव्याजाची स्वतंत्र्यरित्या आकारणी न करणाऱ्या संस्था/सचिवांचे प्रमाण 74.66 % म्हणजे अधिक आहे. अशा बाबतीत सचिवांनी दक्षता घेणे आवश्यक असते.

**<u>त्रुटी, सुधारणा, दुरुस्त्या याबाबत निरीक्षणे</u> :**

- संगणक प्रणाली असल्या तरी या प्रणाली कार्यान्वीत नाहीत, बऱ्याच संस्थांमध्ये संगणक नाही. कर्मचाऱ्यांचे संगणक प्रशिक्षणही झालेले नाही.
- सभासदांना भागदाखले न देणे, ही त्रुटी बहुसंख्य संस्थांच्या बाबतीत आढळून आलली आहे.
- शेतकरी विकासात संस्थेचा वाटा महत्वाचा असतो. हे सर्वच संस्थांच्या संचालक मंडळास-सचिवांना मान्य आहे. तसा प्रयत्न असतो, हेही मत नोंदविलेले गेले आहे.
- किती विकास झाला? कसा विकास झाला? शेतकऱ्यांना कर्ज योजनांचा लाभ होतो की शेतकरी कर्जबाजारी बनतो? अशा प्रश्नांची ठोस उत्तरे मात्र मिळू शकलेली नाहीत.
- संचालक मंडळाचे आणि गावाचे राजकारण यांचा सचिवांना काही त्रास होतो का? या प्रश्नाच्या उत्तराच्या बाबतीत गुळमुळीत उत्तरे काही सचिवांनी दिली. मात्र हा प्रश्न taळण्याचा कलच सर्व सचिवांमध्ये दिसून आला आहे.
- कर्जवसुली व आर्थिक व्यवहार याबद्दलचे सुस्पष्टता दिसून आली नाही. ज्या संस्थांचे छापील वार्षिक अहवाल लेखापरीक्षण अहवाल छापील स्वरुपात/टंकलिखित स्वरुपात मिळाले त्यांच्याच आधाराने सांख्यकिय नोंदीचा अंदाज घेता आला आहे.
- विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांची कार्यक्षमता मोठी आहे. अपवादानेच नियमांची पायमल्ली झालेली दिसली. पण 90% हून अधिक संस्थांचा कारभार शेतीनिष्ठतेचा व शेतकऱ्यांप्रती प्रामाणिकपणाचा आढळून आला.

**<u>समारोप :</u>** नाशिक जिल्ह्यातील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांच्या कार्याचे विश्लेषण या संशोधनात केलेले आहे . या संस्था विविध कार्ये करतात परंतू येथे कृषी व कृषीनिगडीत वित्तीय कार्याचाच विचार केलेला आहे. कृषी विकासाची कार्ये नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक करते. ही कार्य करण्याचे स्थानिक माध्यम म्हणून ह्या मूलभूत सहकारी / प्राथमिक सहकारी संस्था आहेत. प्रत्यक्ष 75 प्राथमिक कृषी सहकारी संस्थांना भेटी देऊन नमुना निवड पद्धतीने कर्ज देवघेव, वितरण व वसुली थकबाकी यांचा विचार येथे केला आहे. शेतीत भांडवल गुंतवताना शेतकऱ्यांचे आश्रयस्थान म्हणून या संस्थांनी स्वातंत्र्यपूर्वकाळापासून महत्वपूर्ण भूमिका निभावली आहे. संचालक मंडळ, शेतकरी सभासद, ना.जि.म. सहकारी बँक, सहकार खाते, बँक शाखा, उपनिबंधक सहकार खाते या सर्वांच्या समन्वयाचे काम करणारे संस्थांचे सचिव हिशोब - आर्थिक व्यवहार यांचे व्यवस्थापन उत्तमरित्या करीत आलेले आहेत. थकबाकी वसुलीच्या बाबतीत जाणीवजागृती व वसुली प्रयत्नात वाढ झाली पाहिजे. हेही संशोधनातून लक्षात आले आहे. आत्मनिर्भर भारत होण्यासाठी विविध कार्यकारी सहकारी संस्था निश्चितच कार्यतत्पर होतील, असे आशादायी चित्र आहे.

**संदर्भसूची**:

1. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अहवाल.
2. सहकार जिल्हा उपनिबंधक यांचे अहवाल.
3. विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांचे अहवाल व लेखापरीक्षण अहवाल.
4. मुलाखती.
5. सर्वेक्षण प्रश्नावली.